# मलाला...
# सामान्यांमधल्या असामान्यत्वाची कहाणी!

ऋजुता बापट-काणे

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**मलाला... सामान्यांमधल्या असामान्यत्वाची कहाणी!**
ऋजुता बापट-काणे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
ऋजुता बापट-काणे
४०१ शुभम सोसायटी, बँक ऑफ इंडियाजवळ,
प्लॉट नं. २, सेक्टर २० डी, ऐरोली, नवी मुंबई-४००७०८.
मो. नं. : ९३७०३६८५७७

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

माझ्या

सर्व

प्रियजनांना

अर्पण...

# प्रस्तावना

'शाळेभोवती तळे साठून सुट्टी मिळेल का?' असं म्हणायच्या वयात 'एक बालक, एक शिक्षक, एक पुस्तक आणि एक लेखणी अवघं जग बदलायला पुरेसे आहेत.' असे अमोघ विचार साऱ्या जगासमोर ठामपणे मांडायची हिंमत एका कोवळ्या वयाच्या शाळकरी मुलीनं दाखवली.

ज्या वयात मुलंमुली छान-छान कपडे घालून मित्रमैत्रिणींसोबत मौजमजा करत असतात, आपल्या आईवडिलांच्या उबदार छायेमध्ये राहून भविष्याची सुंदर स्वप्नं पाहात असतात, त्याच वयामध्ये एका मुलीनं मुलींच्या शिक्षणासाठी, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी आवाज उठवला, समाजकंटकांच्या गोळ्या झेलल्या. इतकंच नाही, तर या हल्ल्यानं डगमगून न जाता धैर्यानं आपलं कार्य पुढं चालू ठेवलं. साऱ्या जगाच्या समोर ठामपणे आपले अमोघ विचार मांडले.

काही लोक म्हणतात, इतक्या लहान वयात या मुलीचे विचार इतके प्रगल्भ कसे असतील? कदाचित तिचे वडील किंवा अन्य कोणीतरी तिच्या तोंडून आपले विचार जगासमोर मांडत असेल. त्याशिवाय इतक्या लहान मुलीला इतकी समज कोठून येईल?

ज्ञानेश्वर माउलींनी ज्ञानेश्वरी लिहिली तेव्हा त्यांचं वय काय होतं? अवघ्या एकविसाव्या वर्षी संजीवन समाधी घेऊन आपली इहलोकीची यात्रा संपवण्याचं धैर्य या महान योग्यामध्ये कुठून आलं? शिवाजी महाराजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली तेव्हा त्यांचं वय काय होतं? त्यांनी अवघ्या सतराव्या वर्षी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली होती.

कर्तृत्वाला वयाचं, जातीपातीचं, देश-प्रदेशाचं बंधन नसतं. या मुलीनं निर्भयपणे, आपल्या प्राणाची पर्वा न करता अन्यायाविरुद्ध आवाज उठवला.

अवघं विश्व तिच्या कर्तृत्वानं दिपून गेलं, तिचा गौरव केला, तिच्यावर सन्मानांचा, पुरस्कारांचा वर्षाव केला. तिचं उदाहरण सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे. जेव्हा एकाच ध्येयानं प्रेरित झालेले भिन्न स्तरांतील लोक एकत्र येतात तेव्हा चमत्कार नक्की घडतो. बदल घडवण्याचं सर्वात पहिलं पाऊल म्हणजे जागरूक होणं. जेव्हा आपण जागरूकतेनं आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींकडं पाहतो तेव्हा अनेक चुकीच्या, अन्यायकारक गोष्टी आपल्या नजरेस पडतात. अशा वेळी मनाची कवाडं बंद करून न घेता मोकळ्या मनानं परिस्थितीचं अवलोकन करायला हवं. आपोआपच अन्यायकारक गोष्टी पाहून तुम्हाला राग येईल, इतरांचं दु:ख पाहून तुमचं मन व्यथित होईल आणि याच गोष्टी तुम्हाला परिस्थिती बदलण्यासाठी प्रेरणा देतील. आपण स्वत:वर विश्वास ठेवायला हवा; परंतु आपण स्वत:वर सोडून साऱ्या जगावर विश्वास ठेवतो. 'मी बदल घडवू शकेन' असा ठाम विश्वास तुमच्या मनात निर्माण व्हायला हवा. त्यानंतर समाजाशी संवाद साधायला हवा. जेव्हा तुम्ही स्वत: एखाद्या ध्येयानं प्रेरित असता तेव्हा तुम्ही अधिक चांगल्या प्रकारे समाजाला प्रेरणा देऊ शकता. अशा वेळी तुम्हाला केवळ काठावर बसून चालत नाही, तर प्रवाहात झोकून द्यावं लागतं.

मलालाला तिच्या वडिलांकडून हेच बाळकडू मिळालं. तिच्या वडिलांनी तिला मुलींच्या शिक्षणविषयक प्रश्नांबद्दल जागरूक व्हायला शिकवलं, मनाची कवाडं खुली ठेवून आपल्या सभोवतालच्या परिस्थितीचं अवलोकन करायला शिकवलं आणि इथंच तिच्या मनात क्रांतीची ठिणगी पेटली... एका धगधगत्या अग्निकन्येचा जन्म झाला. आपल्यावर आणि आपल्या समाजातील आजूबाजूच्या मुलींवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवायला ती सज्ज झाली. तिनं सर्वप्रथम आपल्या मनामध्ये बदल घडवला. आपलं ध्येय निश्चित केलं आणि स्वत:वर विश्वास ठेवला. दहशतवाद्यांकडून मुलींवर होणारा अन्याय पाहून ती पेटून उठली आणि अमोघ भाषणांमधून तिनं समाजाला अन्यायाचा प्रतिकार करण्याची प्रेरणा दिली. तिच्या या संग्रामामध्ये तिला तिच्या आईवडिलांनी भक्कम पाठिंबा दिला.

समाजामध्ये आमूलाग्र बदल घडवू इच्छिणाऱ्यांना प्रसंगी प्राणांची आहुती द्यावी लागते, अपमान सहन करावा लागतो. कारण प्रस्थापितांना आणि अन्यायकारक परिस्थिती लादणाऱ्या लोकांना त्यांना होणारा विरोध सहन होत

नाही. तिच्यासारख्या धगधगत्या व्यक्तिमत्त्वांनी त्यांचे डोळे दिपून जातात. त्यांना सामोरं जायची शक्ती अशा दहशत पसरवणाऱ्या लोकांमध्ये नसते. अशा वेळी त्यांचा आवाज गप्प करणं हे त्यांना अधिक सोपं वाटतं. मग केला जातो एक भ्याड हल्ला ...पण बंदुकीची गोळी अशा अग्निकन्यांचा आवाज थोपवू शकत नाही. सोनं जसं अग्नीमध्ये टाकलं की, अधिक उजळून निघतं, हिरा जसा पैलू पाडल्यावर अधिक तेजस्वी होतो, तसंच काहीसं या असामान्य लोकांबद्दल घडतं. त्यांना संपवण्यासाठी पेटवलेल्या वणव्यामध्ये जळून खाक न होता फिनिक्स पक्ष्याप्रमाणं राखेतून भरारी घेऊन ते गगनाला गवसणी घालतात.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवती भारत
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्।
परित्राणाय साधुनाम् विनाशायच दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।।

–भगवद्गीता चौथा अध्याय श्लोक ७ आणि ८

'जेव्हा जेव्हा आणि जेथे जेथे धर्माचरणाचा ऱ्हास होतो आणि अधर्माचे वर्चस्व होते, त्या त्या वेळी मी स्वत: अवतीर्ण होईन,' स्वत: भगवंतांनी अर्जुनाला भगवद्गीतेमध्ये हे सांगितले आहे. जेव्हा जेव्हा अनाचाराचा कडेलोट होतो, समाजामध्ये अन्याय वाढीस लागतो तेव्हा तेव्हा परमेश्वर कोणत्या ना कोणत्या रूपात जन्म घेऊन अनाचाराला प्रतिबंध घालतो आणि दुष्टांचं निर्दालन करतो. या ठिकाणी भगवंतांना हिंदू, इस्लाम, बौद्ध, जैन, ख्रिश्चन असा कोणताही विशिष्ट धर्म आणि संप्रदाय अपेक्षित नाही.

मग देश कोणताही असो – भले तो भारत असो वा पाकिस्तान, आफ्रिका असो वा अमेरिका. इतिहास साक्षी आहे. जेव्हा जेव्हा जगाच्या पाठीवर कुठेही समाजाला अन्याय सहन करावा लागला, अनाचारानं थैमान घातलं होतं तेव्हा तेव्हा प्रत्येक वेळी काही अत्यंत तेजस्वी व्यक्तिमत्त्वं जगाच्या समोर आली ज्यांनी समाजाच्या विरोधात जाऊन मानवजातीच्या आणि समाजाच्या कल्याणासाठी भरीव कामगिरी बजावली. सुरुवातीला समाजानं त्यांना कडवा विरोध केला. प्रसंगी त्यांना आपल्या प्राणाची बाजी लावावी लागली; परंतु त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वानं अवघ्या जगाचे डोळे दिपवून टाकले आणि मग मात्र जगाला

त्यांच्या मोठेपणाची, त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव झाली. अवघ्या विश्वानंच त्यांना डोक्यावर घेतलं.

नोबेल शांतता पुरस्कारासारख्या सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित होणं ही खरं तर आयुष्याची इतिकर्तव्यता; पण वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी या पुरस्कारानं सन्मानित होणारी ही पहिलीच मुलगी; पण ही मुलगी ना आपला धर्म विसरली, ना आपले संस्कार. जगभर तिच्या नावाचा, तिच्या कार्याचा डंका पिटला जातोय; पण अजूनही ती तशीच नम्र आणि निरागस आहे. तिला आपल्या संस्कृतीचा आणि धर्माचा विलक्षण अभिमान आहे.

कोण आहे ही वीरकन्या?... कोण आहे ही अग्निकन्या?...

तिचं नाव आहे मलाला युसूफझई... शिक्षणाच्या क्षेत्रातील अढळ ध्रुवतारा.

✦✦✦

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | स्वात... पृथ्वीवरील नंदनवन | ११ |
| २. | विद्यादानाचा वसा | १५ |
| ३. | पहिली बेटी धनाची पेटी | २२ |
| ४. | लहानपण देगा देवा | २६ |
| ५. | तालिबान नक्की कोण? | ३४ |
| ६. | तालिबानी दहशतवाद | ३९ |
| ७. | मलालाची डायरी | ६० |
| ८. | अस्मानी-सुलतानी | ७२ |
| ९. | मृत्यूच्या छायेत | ९९ |
| १०. | बर्मिंगहॅम | ११४ |
| ११. | नवीन क्षितिज | १३१ |
| १२. | मलाला फंड | १५६ |
| १३. | नोबेल सन्मान | १६४ |
| १४. | पुरस्कार आणि सन्मान | १९० |
| १५. | मलालाचे विचार | १९५ |
| १६. | संदर्भ सूची | २०८ |


✦✦✦